# युवकभारती

इयत्ता १२ वी

# साहित्यप्रकार - कथा

# कथा म्हणजे काय

- ✍ मूलत: मानवाला आलेले **अनुभव गोष्टीरूपाने** इतरांसाठी मांडण्याचा प्रयत्न करतो.
- ✍ कथेला हजारो वर्षांची परंपरा आहे.
- ✍ कथा दोन रुपात समोर येते- १) मौखिक

  २) लिखित
- ✍ व्याख्या- **कमीत कमी पात्रे** आणि **कमीत कमी प्रसंग** वापरून थोड्या वेळात **परिणामकारकपणे सांगितलेली** व ऐकणाऱ्याच्या **मनावर एकच एक संस्कार करणारी हकीकत** म्हणजे कथा होय.

## कथा-अध्ययनाची उद्दिष्ट्ये




## ‘कथा’या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये

- ➢ कथा मनोरंजन करते
- ➢ कथेमुळे सुसंस्कार होतात.
- ➢ कथा वाचकांची उत्कंठा वाढवते.
- ➢ कथा एककेंद्री असते.
- ➢ कथा भूतकाळात लिहिली जाते.
- ➢ कथा जीवनवेध घेण्यास मदत करते.
- ➢ कथेचे सादरीकरण केले जाते.

## कथेचे घटक

**कथानक**

¥ लेखकाला आलेला विशिष्ट अनुभव

¥ प्रसंग आणि व्यक्ती यांचे सखोल चिंतन यात असते

**लेखकाचा दृष्टीकोन**

¥ लेखकाचा विशिष्ट अनुभवाकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टीकोन दिसतो.

¥ अनुभव मांडण्याची वेगळीवेगळी मांडणी असते.

**व्यक्तिचित्रण**

¥ लेखकाचा दृष्टीकोन व्यक्त करणारी पात्रांची किंवा कथेतील व्यक्तींची योजना केलेली असते

**निवेदन**

¥ लेखकाचे प्रथमपुरुषी किंवा तृतीय पुरुषी निवेदन असते. कथा प्रवाही होण्यासाठी संवादांचा वापर केलेला असतो.

¥ पात्रांचे, घटनांचे वर्णन असते.

**भाषा**

¥ कथेची भाषा कथेतील पात्रांप्रमाणे असते.

¥ पात्रे शहरी, ग्रामीण, स्त्री, पुरुष, वयोगट, शिक्षित, अशिक्षित अशा वेगवेगळ्या सामजिक वर्गातील असतात त्याप्रमाणे कथेतील भाषेची योजना लेखक करत असतो.

¥ प्रतीके आणि प्रतिमांची योजना केलेली असते.

## कथालेखनाचे तंत्र

आकर्षक प्रारंभ → कथेच्या मध्यावर गुंतागुंत → निरगाठ → विस्मयकारक घटनांनी उकल → उत्कंठावर्धक शेवट

## ढोबळमानाने कथेच्या मध्यवर्ती कल्पनेचे प्रकार

**व्यक्तिकेंद्रित**

- व्यक्तीवैशिष्ट्ये, व्यक्तींची विचारप्रक्रिया, मनोविश्लेषण, भावविश्व
- व्यक्तींचे जीवनदर्शन, त्यांच्या जाणीवा यांच्या चित्रणावर भर दिलेला असतो.

**घटनाकेंद्रित**

- घटनेवर भर दिलेला असतो. घटनांमागील जीवनप्रणाली, घटनेची विशिष्टता यांच्या चित्रणावर भर दिलेला असतो.
- उदा. हुंडाबळी, स्त्रीभ्रूणहत्या, वगैरे

**वातावरणकेंद्रित**

- वातावरणाच्या चित्रणावर भर दिला जातो. ग्रामीण वातावरण, सामजिक परंपरा, जाचक रूढी, निसर्ग यांच्या चित्रणावर भर दिला जातो.
- उदा. – स्त्रीशिक्षण, जाती- धर्मातील संघर्ष, ग्रामीण- शहरी संघर्ष , कामगार –मालक संघर्ष वगैरे

## कथेचे उपप्रकार

| विषयानुसार (Theme) | स्वरुपानुसार (Type) | आशयानुसार (Contain) |
|---|---|---|
| ऐतिहासिक | स्फुट कथा | गुढकथा |
| पौराणिक | रूपककथा | भयकथा |
| सामाजिक | लघुकथा | रहस्यकथा |
| अद्भुतरम्य | दीर्घकथा | कौटुंबिक कथा |
| विज्ञानकथा | अति लघुकथा | नीतिकथा, बोधकथा |
| | | विनोदीकथा |

## मराठी कथेचा विकसित प्रवास

गोष्ट (१९२०च्या आधी) → लघुकथा (१०२० ते १९४५) → नवकथा (१९४५ ते १९७५) → आधुनिक कथा (१९७५पासून पुढे)

## मराठी कथेची वाटचाल

**१८९० कथेची सुरुवात**

| कथेचे स्वरूप- स्फुट गोष्टी | मानवी सुख-दुःख, घटनाप्रधानता | भावनाप्रधानता,वास्तवता | बोधप्रद दृष्टीकोन |
|---|---|---|---|

↓

**१९१० - १९२६**

| कथेचे स्वरूप- सामाजिक समस्यात्मक, मनोरंजनात्मक | प्रेम, कलह,विधवा विवाह, बालविधवा,हुंडाबळी |
|---|---|

# १९९० नंतरच्या कथा

कथेसाठी अधिक मुक्त विषय , मांडणीतले स्वातंत्र्य, भाषांतरित कथांचे दालन खुले,

वातावरण बदलाचा अतोनात वाढलेला वेग, खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट,

वस्तूंचे, सेवांचे, जीवनपद्धतीचे, सांस्कृतिक जीवन-संचिताचे बाजारीकरण

भ्रष्टाचार, सत्ताकारण, बेरोजगारी, शेतकऱ्याच्या समस्या व आत्महत्या, ढासळती मूल्यव्यवस्था, कुटुंबव्यवस्था, व्यक्तीकेंद्रियता,शोषणाच्या नव्या रिती, बदलते वर्तमान

# कथेचे तात्पर्य

- मानवी सुख दुःखाचे, आशा- अपेक्षांचे विविध भावानुभव समजून घेणे.
- मानवी मूल्ये, सामजिक मूल्ये, राष्ट्रीय मूल्ये अबाधित ठेवणे, त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे.
- पात्रे, भावविश्व घटना, वातावरण यांच्या आतील वेगवेगळया पैलूंवर प्रकाश टाकणे.
- समाजमनाचा , व्यक्तीमनाचा मनोविश्लेषणात्मक मागोवा घेणे.
- काही ठिकाणी समाजमन तयार करणे.
- समाजातील अनिष्ट गोष्टींवर वैचारिक ताकदीनिशी प्रहार करणे.
- उपरोध ,उपहास यांचा वापर करून समाजातील चैतन्यहीनता, भकासपणा अधोरेखित करणे.